# मुंबई शहरातील विलेपार्ले वार्डातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा गुणवत्तापूर्ण अध्यापनाचा अभ्यास

**संशोधक विद्यार्थी**
**श्री. राकेश अशोक रामराजे**
*सहाय्यक प्राध्यापक,*
*पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन फॉर वूमेन*
*एस.एन.डी.टी. महीला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई 20.*

**संशोधन मार्गदर्शक**
**डॉ. धनंजय एस. वडमारे**
*सहाय्यक प्राध्यापक,*
*वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे*
*अध्यापक महाविद्यालय, जालना*

## 1. प्रस्तावना –

विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. त्याचा सर्वांगीण विकास व्हावा हा मुख्य उद्देश ध्यानात ठेवून सर्व शालेय व सहशालेय उपक्रम आयोजित करणे महत्वपूर्ण ठरते. सहशालेय उपक्रमांमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग असणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे सहशालेय उपक्रमांची बांधणी करतांना विद्यार्थी विकास लक्षात घेतला जातो. विद्यार्थ्यांच्या विकासात शिक्षक हा महत्वाचा दुवा ठरतो. सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून पालक व समाज यांच्याशी बांधीलकी अधिक दृढ होते. बालकांच्या शिक्षणाची खरी सुरुवात माता–पिता व कुटुंबानंतर समाजातच होत असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांला समाजातच कार्यरत व्हावे लागते, त्यामुळे त्यांच्या सामाजिक पैलूंचा विकास होणे, सामाजिक स्थितीची त्याला जाणिव असणे महत्वाची ठरते. सहशालेय कार्यक्रमातून सामाजिक स्थितींचे दर्शन होते. विद्यार्थी कुटुंबात, समाजात, शाळेत वावरत असतांना विभिन्न प्रकारच्या स्तरावर आपल्या विचारांची आदान–प्रदान करित असतो.

समाजातील इतर आर्थिक, धार्मिक, राजकिय, सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी विद्यार्थी संबंधित असतो, म्हणून कुटुंबाचे स्वरुप, समाजातील त्याचे स्थान, त्याची अंर्तरचना व कार्य इ. लक्षणे सापेक्ष आहेत. व्यक्ती आणि समाज यांमधील सांस्कृतिक पार्श्वभूमीवर परस्पर संबंधांचा पध्दतशीर अभ्यास म्हणजे समाजशास्त्र. या समाजशास्त्रात व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या बाबींचा अभ्यास–रितिरिवाज, कुटुंबसंस्था, धर्म, सामाजिक संस्था, जातिसंस्था–जातिभेद इ. घटकांचा अभ्यास होय. बालकाच्या व्यक्तिमत्वावर परिणाम करणारे घटक म्हणजे शरीरयष्टी, जैवरसायने, विविध क्षमता, सामाजिक प्रेरणा, कुटुंब, कुटुंबाची आर्थिक स्थिती, सामाजिक परिसर, शाळा व त्यात होणाऱ्या विविध आंतरक्रिया हे होय. बालकांच्या विकासात कुटुंब, शाळा, सामाजिक परिसर महत्वाची भूमिका बजावतात, म्हणून शाळेतच बालकाच्या भावना अविष्कारास संधी देणे व वळण लावणे अपेक्षित आहे. शाळांमधून शिक्षणाची भावना, कृती, प्रेरणा यांना योग्य मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थी आपले आचार, विचार, वर्तन व कृती याबाबत आपल्या कुटुंबामध्ये प्रदर्शित करित असतो. कुटुंब तसेच समाज व शाळा यांचेकडून मिळणाऱ्या प्रेरणेवर त्याचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असते.

## 2. संशोधनाची गरज –

विद्यार्थ्यांना चांगले व योग्य दर्जेदार शिक्षण मिळविण्यासाठी, शैक्षणिक समस्यांचे निरसन करुन सामाजिक समस्या लक्षात घेऊन, त्यांची कुटुंबाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, कुटुंबाची धार्मिक स्थिती, कुटुंबाची आर्थिक स्थिती, कुटुंबाचा शैक्षणिक स्तर यांची परिस्थिती जाणून घेऊन त्याच्या वयोगटानूसार योग्य व

गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्याला त्याच्या परिसराशी जोडून ठेवणाऱ्या सामाजिक बांधीलकीचे भाव जपणाऱ्या शिक्षणाची गरज आहे. शाळेमध्ये विद्यार्थी दाखल झाल्यानंतर सामाजिक जीवनाचा भाग बनतो. शालेय शिक्षण, अभ्यासक्रम, वातावरण, वयपरत्वे मिळणारे घटनात्मक अधिकार या साऱ्या गोष्टी शालेय विद्यार्थीदशेत घडत असतात. ''शिक्षणाचा स्तर सर्व विद्यार्थ्यांसाठी समान व सारखा असणे गरजेचे आहे.'' शिक्षणहक्क कायद्यानुसार प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मुक्त व सक्तीचे असून सुध्दा आज प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष होतांना दिसून येते. वरिल सर्व कुटुंबाच्या स्थितीचे प्रथमदर्शी सारासार विचार केल्यास आपणास असे दिसून येते की प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा,' सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक शैक्षणिक स्तर हा गुणवत्ता वाढीसाठी महत्वपूर्ण आहे.

''आपला वर्ग हा समाजाची छोटी प्रतिकृती असते. त्यात विविध कुटुंबातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक शैक्षणिक स्तरातील विद्यार्थी असतात.'' शाळेमध्ये विद्यार्थी अध्ययन करित असतांना त्यांचा वर्ग त्यांची शाळा हे आपले विश्व मानत असतात. त्यामध्ये मिळणारे ज्ञान हेच खरे प्रमाण आहे अशी त्यांची धारणा असते. पण, वर्गामध्ये/शाळेमध्ये वरवर पाहता एकाच गटाचा विचार करता विद्यार्थ्यांत अनेक वृत्ती दिसून येतात. त्यांचा अभ्यास करण्यासाठी गुणवत्तापूर्वक चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांस पुरक ज्ञान देऊन त्याच्या गुणवत्तेवर कोणता परिणाम होतो. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

3. **संशोधनाचे महत्व –**

संशोधक बी.एड् विद्यार्थ्यांचे सराव पाठ बघण्यास महानगरपालिकेच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक तसेच अनुदानित, विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दु शाळांवर जात असे, त्यावेळी विद्यार्थी शाळेत येतांना त्यांचे परिसर, आर्थिक परिस्थती, धार्मिक परिस्थिती तसेच परिवाराची सांस्कृतिक स्थिती, विद्यार्थ्यांच्या राहणीमानावर, गणवेशावर, तसेच त्याची आपले विचार मांडण्यांची शैली, संस्कृतीप्रमाणे झालेले सोपस्कर, त्यावर धार्मिकतेचा पगडा, राहणीमानामध्ये आर्थिकतेच्या बाबींतून दिसणारे बदल यातून गुणवत्तेवर होणारा परिणाम नजरेस पडत होता. त्यांच्या अध्ययन–अध्यापनावर विशेषतः शाळेतील ज्ञानावर या सर्व बाबींतून प्रभाव निदर्शनास येत होता.

त्यामुळे संशोधकाने शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण अध्यापनाचा, विद्यार्थ्यांच्या विकासावर परिणाम करणारे घटक व त्यांचा गुणवत्तेचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टिने तसेच सर्व बाबींचा चिकित्सक अभ्यास झाला तर त्याला कुटुंबाच्या परिस्थीतीनूसार त्याला कोणत्या परिस्थितीतून अध्यापनात गुणवत्ता टिकवून ठेवणे किंवा मिळविणे यावर प्रकाश पडेल या सर्व बाबींतून संशोधकाने महत्व लक्षात घेऊन सदरचे संशोधन कार्य करण्याचे योजिले आहे.

4. **संशोधनाचे समस्या विधान –**

मुंबई शहरातील विलेपार्ले वार्डातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा गुणवत्तापूर्ण अध्यापनाचा अभ्यास.

5. **समस्या विधानातील महत्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या –**

**प्राथमिक शाळा** – महाराष्ट्र शासनांतर्गत विभिन्न माध्यमातून इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत (वयोगट 6 ते 14 वर्ष) शिक्षण देणारा स्तर.

**शिक्षक** – विभिन्न माध्यमातून विविध विषयांचे अध्यापनाचे कार्य करणारे प्रशिक्षित घटक.

**गुणवत्ता** – वेळ व मूल्यमापन यांवर लक्ष ठेऊन काढलेला निष्कर्ष.

**अध्यापन** – शिकावयास प्रेरणा देणे म्हणजे अध्यापन.

6. **संशोधनाची गृहितके** –

1. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कौंटुबिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तरावर समस्या आहेत.
2. प्राथमिक शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण अध्यापन करतांता शिक्षकांना अडचणीं येतात.
3. विद्यार्थ्यांमध्ये बुध्यांक सर्वसाधारण असतो.
4. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक मुलभूत गरजा पूर्ण करण्याच्या विवंचनेत असल्यामुळे शिक्षणाकडे दुर्लेक्षित व उदासीन असतात.

7. **संशोधनाची उद्दिष्टे** –

1. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या,' कुटुंबाचा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तर याबाबत शिक्षकांच्या अध्यापनाच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
2. प्राथमिक शाळेतील शिक्षकांना अध्यापन करतांना विद्यार्थ्यांच्या,' कुटुंबाचा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तर यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

8. **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा** –

**संशोधनाची व्याप्ती** – मुंबई पश्चिम उपनगरामधील विलेपार्ले वार्डातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापना दरम्यान विद्यार्थ्यांच्या,' कुटुंब, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक स्तरांचा अभ्यास करणे यापुरतेच व्याप्त आहे.

**संशोधनाची मर्यादा** – मुंबई पश्चिम उपनगरामधील विलेपार्ले वार्डातील प्राथमिक शाळेतील इ. 1 ली ते 5 वीच्या शिक्षकांच्या अध्यापन दरम्यान विद्यार्थ्यांच्या,' कुटुंबाचा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक गुणवत्तापूर्ण संपादणूक यांचा अभ्यास करणे पुरतेच मर्यादीत आहे.

9. **संशोधनाची पध्दती** – संशोधनाचे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड केली आहे.

10. **संशोधनाची साधने** – प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

11. **न्यादर्श** –

मुंबई शहरामधील विलेपार्ले वार्डात 3 मराठी, 2 हिंदी माध्यमाच्या, 1 उर्दु अशा एकूण 6 महानगर पालिकेच्या शाळा, 1 अनुदानित प्राथमिक मराठी माध्यमाची शाळा, 1 विनाअनुदानित मराठी माध्यम व 1 विनाअनुदानित हिंदी माध्यमाची प्राथमिक शाळा, 1 कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा असे एकूण 10 प्राथमिक शाळेत अध्यापन करणारे 50 शिक्षक आहेत.

**न्यादर्श निवड** –

सदर संशोधनासाठी संशोधकाने संशोधनासाठी समानता व समता एकत्रित न्यादर्श निवडीनूसार संशोधनासाठी सर्व प्रकारांच्या अनुदान प्रकारातील एकूण 10 शाळांपैकी इ. 1 ली ते 5 वी चे वर्ग असणाऱ्या शाळांपैकी समानता व समता एकत्रित न्यादर्श निवडीने 5 शाळांची निवड केलेली आहे. सदरहू न्यादर्श पध्दतीने त्यात अध्ययन करणाऱ्या एकूण शिक्षकांपैकी 50 टक्के म्हणजेच 25 शिक्षक निवडण्यात आले आहेत.

12. **सांख्यिकीय परिणाम –**

केंद्रीय प्रवृत्तीचे परिमाणे – शेकडा टक्केवारी

**अनुमानात्मक विश्लेषण** – प्रस्तुत तुलनात्मक स्थितीतून शेकडा टक्केवारी यांच्या माध्यमातून अनुमानात्मक विश्लेषणाचा वापर केलेला आहे.

13. **संशोधनाची कार्यवाही –**

संबंधित प्राथमिक शाळेला भेट देवून त्यांची अनुमती घेण्यात आली. प्रश्नावली निर्मिती (शिक्षक प्रश्नावली) तयार करण्यात आली. तज्ज्ञांकडून प्रश्नावली तपासणी व सुधारणा केली. कार्यक्रमाची रचना व नियोजनानुसार प्रश्नावली भरुन घेतली. प्रश्नावलीनुसार संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले. निष्कर्ष काढण्यात आले.

14. **संख्याशास्त्रीय विश्लेषण –**

शिक्षकांना दिलेल्या प्रतिसादात्मक प्रश्नास शिक्षकांनी खालील कोष्टकामध्ये दर्शविल्याप्रमाणे शेकडा टक्केवारी प्रमाणे प्रतिसाद नोंदविला आहे.

**कोष्टक क्र. 1**

**प्रतिसादात्मक प्रश्नास शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाची टक्केवारी**

| अ. क्र. | प्रतिसादात्मक प्रश्न | पूर्णपणे सहमत | सहमत | असहम | पूर्णपणे असहमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षक म्हणून तुमची भुमिका शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे ? | 100 | 0 | 0 | 0 |
| 2 | तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पाठय–पुस्तके शासनातर्फे दिले जातात ? | 58 | 4 | 8 | 31 |
| 3 | अध्ययन – अध्यापन करणे करिता शालेय सर्व साहित्य खरेदी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे पालक सक्षम आहेत ? | 63 | 23 | 6 | 8 |
| 4 | विद्यार्थ्यांच्या पालकांना दरमहिन्याप्रमाणे शिक्षणशुल्क व इतर फी भरावी लागते? | 77 | 8 | 10 | 6 |
| 5 | घरापासून शाळेतील अंतराप्रमाणे नियमितपणे वेळेवर येणे–जाणे करिता पालकांनी आपल्या पाल्याची सोय केलेली आहे ? | 83 | 12 | 6 | 0 |
| 6 | नियमित शाळेत जाणेबाबत विद्यार्थ्यांच्या कुटुंबातून वैयक्तिक लक्ष दिले जाते ? | 54 | 35 | 8 | 4 |
| 7 | विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात ? | 63 | 15 | 12 | 10 |
| 8 | शाळेत काय शिकविले याविषयी पालकांना शिक्षक गृहपाठावर स्वाक्षरी आणण्यास सांगतात ? | 50 | 33 | 10 | 8 |
| 9 | एकत्र कुटुंब पध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर अधिक लक्ष दिले जाते? | 88 | 12 | 0 | 0 |
| 10 | सामान्य पालक पाल्याच्या शिक्षणाकरिता लागणाऱ्या गरजा वेळेवर पूर्ण करु शकत नाही ? | 10 | 15 | 25 | 50 |
| 11 | माझी शाळा म्हणून शिक्षकांना शाळेचे आकर्षण आहे ? | 54 | 35 | 8 | 4 |


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | शाळेची इमारत, वर्गखोल्या आकर्षक सुंदर व स्वच्छ व नियमानुसार वर्गखोल्या मोठया आहेत ? | 63 | 15 | 12 | 10 |
| 13 | शिक्षक कर्मचाऱ्यांना, विद्यार्थी मुला, मुलींना स्वतत्र स्वच्छ स्वच्छतागृह / प्रसाधनगृह आहे ? | 48 | 35 | 10 | 8 |
| 14 | शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांना एकत्रित शुध्द पिण्याची (आर.ओ.) ची सोय आहे ? | 85 | 15 | 0 | 0 |
| 15 | वर्गखोल्यांध्ये शिक्षकांना बसण्यासाठी खुर्ची, टेबल व डायस आहे ? | 83 | 10 | 6 | 2 |
| 16 | शाळेमध्ये शिक्षकांना व विद्यार्थ्यांना गणवेश आहेत ? | 63 | 15 | 12 | 10 |
| 17 | शिक्षकांना वेतनश्रेणी नुसार वेतन असून शासन नियमानुसार सर्व सवलती आहेत? | 50 | 33 | 10 | 8 |
| 18 | शासन अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विभिन्न प्रशिक्षणास शाळेमधून पाठविले जाते ? | 87 | 13 | 0 | 0 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे संपादित गुण कसोटीचा वापर करण्यात येतो ? | 50 | 33 | 10 | 8 |
| 20 | शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा वाढविणेकामी शाळेतून प्रोत्साहन दिले जाते ? | 85 | 15 | 0 | 0 |

14.1 अर्थनिर्वचन –

**प्रश्न क्र. 1** : शिक्षक म्हणून तुमची भुमिका शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे ?

**आलेख क्र. 1**

**शिक्षक म्हणून तुमची भुमिका शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शिक्षक म्हणून तुमची भुमिका शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे. या विधानास 100 टक्के पूर्णपणे सहमती, 0 टक्के सहमती, 0 टक्के असहमती व 0 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र 2** : तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पाठय–पुस्तके शासनातर्फे दिले जातात ?

**आलेख क्र. 2**

**तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पाठय–पुस्तके शासनातर्फे दिले जातात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पाठय–पुस्तके शासनातर्फे दिले जातात. या विधानास 58 टक्के पूर्णपणे सहमती, 4 टक्के सहमती, 7 टक्के असहमती व 31 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र 3** : अध्ययन – अध्यापन करणे करिता शालेय सर्व साहित्य खरेदी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे पालक सक्षम आहेत ?

**आलेख क्र. 3**

**अध्ययन – अध्यापन करणे करिता शालेय सर्व साहित्य खरेदी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे पालक सक्षम आहेत, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, अध्ययन – अध्यापन करणे करिता शालेय सर्व साहित्य खरेदी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे पालक सक्षम आहेत. या विधानास 63 टक्के पूर्णपणे सहमती, 23 टक्के सहमती, 6 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 4** : विद्यार्थ्यांच्या पालकांना दरमहिन्याप्रमाणे शिक्षणशुल्क व इतर फी भरावी लागते ?

**आलेख क्र. 4**

**विद्यार्थ्यांच्या पालकांना दरमहिन्याप्रमाणे शिक्षणशुल्क व इतर फी भरावी लागते, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, विद्यार्थ्यांच्या पालकांना दरमहिन्याप्रमाणे शिक्षणशुल्क व इतर फी भरावी लागते. या विधानास 77 टक्के पूर्णपणे सहमती, 7 टक्के सहमती, 10 टक्के असहमती व 6 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 5** : घरापासून शाळेतील अंतराप्रमाणे नियमितपणे वेळेवर येणे–जाणे करिता पालकांनी आपल्या पाल्याची सोय केलेली आहे ?

**आलेख क्र. 5**

**घरापासून शाळेतील अंतराप्रमाणे नियमितपणे वेळेवर येणे–जाणे करिता पालकांनी आपल्या पाल्याची सोय केलेली आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, घरापासून शाळेतील अंतराप्रमाणे नियमितपणे वेळेवर येणे–जाणे करिता पालकांनी आपल्या पाल्याची सोय केलेली आहे. या विधानास 83 टक्के पूर्णपणे सहमती, 12 टक्के सहमती, 5 टक्के असहमती व 0 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

प्रश्न क्र. 6 : नियमित शाळेत जाणेबाबत विद्यार्थ्यांच्या कुटुंबातून वैयक्तिक लक्ष दिले जाते ?

**आलेख क्र. 6**

**नियमित शाळेत जाणेबाबत विद्यार्थ्यांच्या कुटुंबातून वैयक्तिक लक्ष दिले जाते, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, नियमित शाळेत जाणेबाबत विद्यार्थ्यांच्या कुटुंबातून वैयक्तिक लक्ष दिले जाते. या विधानास 54 टक्के पूर्णपणे सहमती, 35 टक्के सहमती, 8 टक्के असहमती व 3 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 7** : विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात ?

**आलेख क्र. 7**

**विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात. या विधानास 63 टक्के पूर्णपणे सहमती, 15 टक्के सहमती, 12 टक्के असहमती व 10 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 8** : शाळेत काय शिकविले याविषयी पालकांना शिक्षक गृहपाठावर स्वाक्षरी आणण्यास सांगतात ?

आलेख क्र. 8

**शाळेत काय शिकविले याविषयी पालकांना शिक्षक गृहपाठावर स्वाक्षरी आणण्यास सांगतात, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शाळेत काय शिकविले याविषयी पालकांना शिक्षक गृहपाठावर स्वाक्षरी आणण्यास सांगतात. या विधानास 50 टक्के पूर्णपणे सहमती, 32 टक्के सहमती, 10 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 9** : एकत्र कुटुंब पध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर अधिक लक्ष दिले जाते ?

आलेख क्र. 9

**एकत्र कुटुंब पध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर अधिक लक्ष दिले जाते, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, एकत्र कुटुंब पध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर अधिक लक्ष दिले जाते. या विधानास 88 टक्के पूर्णपणे सहमती, 12 टक्के सहमती, 0 टक्के असहमती व 0 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 10** : सामान्य पालक पाल्याच्या शिक्षणाकरिता लागणाऱ्या गरजा वेळेवर पूर्ण करु शकत नाही ?

**आलेख क्र. 10**

**सामान्य पालक पाल्याच्या शिक्षणाकरिता लागणाऱ्या गरजा वेळेवर पूर्ण करु शकत नाही, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, सामान्य पालक पाल्याच्या शिक्षणाकरिता लागणाऱ्या गरजा वेळेवर पूर्ण करु शकत नाही. या विधानास 10 टक्के पूर्णपणे सहमती, 15 टक्के सहमती, 25 टक्के असहमती व 50 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 11** : माझी शाळा म्हणून शिक्षकांना शाळेचे आकर्षण आहे ?

**आलेख क्र. 11**

**माझी शाळा म्हणून शिक्षकांना शाळेचे आकर्षण आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, माझी शाळा म्हणून शिक्षकांना शाळेचे आकर्षण आहे. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांना चांगली शिस्त आहे. या विधानास 54 टक्के पूर्णपणे सहमती, 34 टक्के सहमती, 8 टक्के असहमती व 4 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 12** : शाळेची इमारत, वर्गखोल्या आकर्षक सुंदर व स्वच्छ व नियमानुसार वर्गखोल्या मोठया आहेत ?

आलेख क्र. 12

शाळेची इमारत, वर्गखोल्या आकर्षक सुंदर व स्वच्छ व नियमानुसार वर्गखोल्या मोठया आहेत, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शाळेची इमारत, वर्गखोल्या आकर्षक सुंदर व स्वच्छ व नियमानुसार वर्गखोल्या मोठया आहेत. या विधानास 63 टक्के पूर्णपणे सहमती, 15 टक्के सहमती, 12 टक्के असहमती व 10 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 13** : शिक्षक कर्मचाऱ्यांना, विद्यार्थी मुला, मुलींना स्वतत्र स्वच्छ स्वच्छतागृह/प्रसाधनगृह आहे ?

आलेख क्र. 13

शिक्षक कर्मचाऱ्यांना, विद्यार्थी मुला, मुलींना स्वतत्र स्वच्छ स्वच्छतागृह/प्रसाधनगृह आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.





अर्थनिर्वचन : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शिक्षक कर्मचाऱ्यांना, विद्यार्थी मुला, मुलींना स्वतत्र स्वच्छ स्वच्छतागृह/प्रसाधनगृह आहे. या विधानास 48 टक्के पूर्णपणे सहमती, 34 टक्के सहमती, 10 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 14** : शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांना एकत्रित शुध्द पिण्याची (आर.ओ.) ची सोय आहे ?

**आलेख क्र. 14**

**शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांना एकत्रित शुध्द पिण्याची (आर.ओ.) ची सोय आहे, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांना एकत्रित शुध्द पिण्याची (आर.ओ.) ची सोय आहे. या विधानास 85 टक्के पूर्णपणे सहमती, 15 टक्के सहमती, 0 टक्के असहमती व 0 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 15** : वर्गखोल्यांध्ये शिक्षकांना बसण्यासाठी खुर्ची, टेबल व डायस आहे ?

**आलेख क्र. 90**

**वर्गखोल्यांध्ये शिक्षकांना बसण्यासाठी खुर्ची, टेबल व डायस आहे ? याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





अर्थनिर्वचन : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, वर्गखोल्यांध्ये शिक्षकांना बसण्यासाठी खुर्ची, टेबल व डायस आहे. या विधानास 83 टक्के पूर्णपणे सहमती, 9 टक्के सहमती, 6 टक्के असहमती व 2 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 16** : शाळेमध्ये शिक्षकांना व विद्यार्थ्यांना गणवेश आहेत ?

**आलेख क्र. 16**

**शाळेमध्ये शिक्षकांना व विद्यार्थ्यांना गणवेश आहेत, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शाळेमध्ये शिक्षकांना व विद्यार्थ्यांना गणवेश आहेत. या विधानास 63 टक्के पूर्णपणे सहमती, 15 टक्के सहमती, 12 टक्के असहमती व 10 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 17** : शिक्षकांना वेतनश्रेणी नुसार वेतन असून शासन नियमानुसार सर्व सवलती आहेत ?

**आलेख क्र. 104**

**शिक्षकांना वेतनश्रेणी नुसार वेतन असून शासन नियमानुसार सर्व सवलती आहेत, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





अर्थनिर्वचन : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शिक्षकांना वेतनश्रेणी नुसार वेतन असून शासन नियमानुसार सर्व सवलती आहेत. या विधानास 50 टक्के पूर्णपणे सहमती, 32 टक्के सहमती, 10 टक्के असहमती व 8 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 18** : शासन अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विभिन्न प्रशिक्षणास शाळेमधून पाठविले जाते ?

**आलेख क्र. 18**

**शासन अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विभिन्न प्रशिक्षणास शाळेमधून पाठविले जाते, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शासन अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विभिन्न प्रशिक्षणास शाळेमधून पाठविले जाते. या विधानास 87 टक्के पूर्णपणे सहमती, 13 टक्के सहमती, 0 टक्के असहमती व 0 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

**प्रश्न क्र. 19** : विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे संपादित गुण कसोटीचा वापर करण्यात येतो ?

**आलेख क्र. 19**

**विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे संपादित गुण कसोटीचा वापर करण्यात येतो, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**





**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे संपादित गुण कसोटीचा वापर करण्यात येतो. या विधानास 50 टक्के पूर्णपणे सहमती, 33 टक्के सहमती, 10 टक्के असहमती व 7 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

प्रश्न क्र. 20 : शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा वाढविणेकामी शाळेतून प्रोत्साहन दिले जाते ?

आलेख क्र. 107

**शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा वाढविणेकामी शाळेतून प्रोत्साहन दिले जाते, याबाबत दिलेल्या प्रतिसादासाचा वृत्तालेख.**




**अर्थनिर्वचन** : संशोधनासाठी नमुना निवडलेल्या शिक्षकांनी, शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा वाढविणेकामी शाळेतून प्रोत्साहन दिले जाते. या विधानास 85 टक्के पूर्णपणे सहमती, 15 टक्के सहमती, 0 टक्के असहमती व 0 टक्के पूर्णपणे असहमती दर्शविली आहे.

15. निष्कर्ष –

1. विद्यार्थ्यांना कुटूंबानंतर शाळेमध्ये समाजाशी बांधिल असणारे सर्व मूल्ये, आचरण, जीवन जगण्याची कला या सर्वच बाबतीत ज्ञान शाळेमध्ये शिक्षकांच्या माध्यमातून मिळत असते त्यामुळे शिक्षकाची भूमिका शाळा ही समाजाची प्रतिकृती अशा स्वरुपातील आहे.
2. शासकीय अनुदाने घेणाऱ्या शाळांमध्ये पाठय–पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत दिले जातात परंतु शासकीय अनुदाने न घेणाऱ्या शाळांमध्ये पाठय–पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत दिले जात नाही.
3. कुटूंबातील सदस्यांची शैक्षणिक गुणवत्ता कुटूंबाला आर्थिक दृष्टया सक्षम करत असते म्हणूनच कुटूंबातील प्रत्येक सदस्याच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले गेले पाहीजेत. शिक्षणामुळे बऱ्याचशा कुटूंबांमध्ये विद्यार्थ्यांचे पालक शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी सक्षम दिसून येत आहे.
4. शासकीय अनुदाने घेणाऱ्या शाळांमध्ये दरमहिन्याप्रमाणे शिक्षणशुल्क व इतर फी भरावी लागत नाही. परंतु शासकीय अनुदाने न घेणाऱ्या शाळांमध्ये दरमहिन्याप्रमाणे शिक्षणशुल्क व इतर फी भरावी लागते.
5. सुजान पालकत्वानुसार अनेक पालकांनी त्यांच्या पाल्यांच्या सुरक्षित शालेय प्रवासासाठी व्यवस्था केलेली दिसून येते. मात्र काही कुटूंबांच्या अडचणींमुळे पाल्यांना शाळेत येण्याकरिता प्रवासासाठी तडजोड करावी लागते.
6. अध्ययनातील सातत्य कायम राहण्यासाठी, शाळेतील अभ्यासक्रम, गृहपाठ नियमित पूर्ण व्हावा याकरिता अनेक पालक आग्रही असतात. त्या अनुशंगाने बहुतेक सर्वच पालक आपल्या पाल्याने नियमित शाळेत जावे यासाठी वैयक्तिक लक्ष देतात.

7. शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी शाळेस कुटुंबातील व्यक्ती भेट देतात, सर्वच पालकांनी विद्यार्थ्यांची प्रगती जाणून घेण्यासाठी कुटुंबातील व्यक्तींनी शाळेस भेट देऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीस प्रोत्साहन दिले पाहिजे.
8. पाल्याची शैक्षणिक प्रगती पालकांपर्यंत पोहचविण्याचा हा उत्तम मार्ग आहे. यानुसार पालकांना आपल्या पाल्याकडे आणखी कशा पध्दतीने आणि किती प्रमाणात लक्ष देणे गरजेचे आहे हे समजते.
9. एकत्र कुटुंब पध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता तसेच सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण उपलब्ध होते. विद्यार्थ्यांच्या योग्य वाढीसाठी व विकासासाठी एकत्र कुटूंबातील संस्कारक्षम वातावरण उपयुक्त ठरते.
10. कुटूंबातील आर्थिक परिस्थिती कशीही असली तरीही पाल्याच्या शिक्षणाकरिता लागणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी कुटूंब कायम प्रयत्नशील असते. प्रत्येक पालक आपल्या पाल्यांमध्ये स्वतःचा भविष्यकाळ बघत असतो त्यामूळे त्यांचा येणारा भविष्यकाळ उच्चशिक्षित, गुणवत्ता संपन्न असावा असे कायम त्यांना वाटत असते.
11. शाळा हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे केंद्रस्थान आहे त्यामुळेच बहुतांश शिक्षकांना कुटूंबाइतकीच शाळा प्रिय आहे. शाळेतील शिक्षक हे विद्यार्थ्याला घडविण्यात व देशाचा उत्तम नागरिक घडविण्यात महत्वाची भुमिका पार पाडत असतात. प्रत्येक शिक्षकाला आपल्या कर्म भूमीविषयी आदर आणि आकर्षण असणे हे साहजिकच आहे.
12. शाळेची भव्य इमारत, स्वच्छ, सुंदर व आकर्षक वर्गखोल्या, वर्गखोल्यांमध्ये असणारा पुरेसा सुर्यप्रकाश आणि योग्य वायूविजन हया भौतिक गरजा प्रत्येक शाळेत असणे महत्वाचे आहे. अशा वातावरणात विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देतांना शिक्षकांना तसेच अध्यापन करतांना विद्यार्थ्यांना आनंद वाटतो.

13 शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये येणारा महत्वाचा घटक म्हणजे स्वच्छतागृह/प्रसाधनगृह यांची स्वच्छता होय. विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षकांचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी शिक्षक कर्मचाऱ्यांना, विद्यार्थी मुला, मुलींना स्वतंत्र स्वच्छ स्वच्छतागृह/प्रसाधनगृह व्यवस्था केलेली असते. यातून शाळेतील प्रत्येक घटकाचे आरोग्य अबाधित राखण्यास मदत होते.

14. बहुतांशी आजार हे पाण्याच्या अशुध्दीकरणामूळे होतात. आरोग्याच्या दृष्टीकोनातून स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षकांना शुध्द पाण्याची व्यवस्था शाळेने केलेली आहे.
15. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक ज्ञानदानाचे कार्य शिक्षक करित असतात. शैक्षणिक साधनांचा योग्य पध्दतीने वापर करण्यासाठी शिक्षकांना या भौतिक सुविधा उपल्बध करुन देणे ही सर्वस्वी शाळेची जबाबदारी आहे. डायसच्या वापराने वर्गनियंत्रण करण्यासाठी तसेच वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांकडे लक्ष केंद्रीत करण्यासाठी होतो.

16 विद्यार्थ्यांना शालेय गणवेश हा शासन आदेशानुसार अनिवार्यच असतात. त्यानुसार प्रत्येक शाळेने ठरवून दिलेला गणवेश शाळेत येतांना परिधान करुन येणे हे विद्यार्थ्यांना बंधनकारक असते. शालेय शिस्तीचा हा एक भाग आहे. शिक्षकांचा गणवेश हा सर्वस्वी शाळांचे पदाधिकारी किंवा शिक्षण संस्थांचे संचालक यांवर अवलंबून असते. विद्यार्थी किंवा शिक्षक कोणत्याही धर्माचे असोत ते शाळेमध्ये समान आहे ही भावना यामुळे वाढीस लागते.

17. सर्व अनुदानीत शाळांमधील शिक्षकांना वेतनश्रेणी नुसार वेतन दिले जाते त्याचबरोबर शासन निर्णयानुसार सर्व सवलती देखील मिळतात. विनाअनुदानीत शाळांमध्ये मात्र शिक्षकांना वेतन श्रेणीनुसार वेतन व सवलती मिळत नाहीत.
18. नविन सुधारित अभ्यासक्रमानुसार वेळोवेळी शासनातर्फे शिक्षकांसाठी प्रशिक्षणांचे आयोजन केले जाते. अशा प्रशिक्षणांमुळे शिक्षकांना सुधारीत अभ्यासक्रम व मूल्यमापन याबाबत सविस्तर माहिती दिली जाते. याचाच फायदा शिक्षकांना अध्यापनासाठी तसेच मूल्यमापनासाठी होत असतो.
19. विद्यार्थ्यांनी परीक्षांमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे प्रात्यक्षिक, निबंध, स्वाध्याय या द्वारे मिळविलेल्या एकत्रित गुणांनुसार गुणदान केले जाते. विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणेच गुणदान करतांना संपादित गुण कसोटीचा वापर केला जातो.
20. शिक्षकांच्या नियुक्ती दरम्यान त्यांची असलेली शैक्षणिक अर्हता या पर्यंतच मर्यादीत न राहता अनेक शिक्षक सेवांतर्गत राहून आपली शैक्षणिक पात्रता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतात. शाळेतील सर्व घटक अशा शिक्षकांना वेळोवेळी प्रोत्साहीत करुन त्यांचे मनोबल वाढविण्याचे उत्तम कार्य करतात.

**16. शिफारशी –**

1. प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांची कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक व बौध्दिक कुवत या बाबीं विचारात घेऊन विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे.
2. शासनातर्फे आयोजित सर्व प्रशिक्षणांना उपस्थित राहून अपेक्षित असलेले बदल शिक्षकांनी स्वतःच्या अध्यापन पध्दती व मूल्यमापन पध्दतींमध्ये करावे.
3. वर्ग अध्यापन करतांना शिक्षकांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा तसेच शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करावा.
4. शिक्षकांचा पालक संपर्क चांगला असणे ही शाळेच्या विकासासाठी महत्वपूर्ण बाब ठरते.
5. शालांन्तर्गत तसेच शालाबाहय स्पर्धा परीक्षांना, खेळांच्या स्पर्धांना विद्यार्थी जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होतील यादृष्टीने शिक्षकांनी सतत प्रयत्न करावे.
6. शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागणे, तसेच त्यांचा व्यक्तिमत्व विकास वृध्दिंगत होईल याकरिता विशेष उपक्रम शाळेत राबविले जावेत.

**17. समारोप –**

आपली लोकशाही न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या चार स्तंभावर उभी आहे. व्यक्तिप्रतिष्ठा आणि धर्मनिरपेक्षता या दोन मूल्यांना देखील आपल्या राज्यघटनेत अधिक महत्व आहे. लोकशाही मूल्ये बालकांच्या मनात रुजविण्याचे काम आपल्या शिक्षण प्रणालीतून जाणीवपूर्वक करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम वयामध्ये परिवाराची भुमिका व त्यास प्राप्त होणाऱ्या मुलभूत सुविधा त्यावर त्याचा सर्वांगीण विकास होत असतो. त्याच्या भौतिक सुविधा पुर्ण करण्याची जबाबदारी मुख्यत्वे त्याच्या परिवाराची असते, आणि परिवाराच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परिणाम त्याच्या अध्ययन अध्यापनावरील गुणवत्तेवर होत असतो. त्याच्या गुणवत्तेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला तर त्याच्या सर्वांगीण विकासासाठी व भावी जीवनाच्या जडणघडणीवर सकारात्मक परिणाम होण्यास मदत होईल.

18. संदर्भ –


1. कुलकर्णी, पी. के. (2013). *मानवी हक्क आणि सामाजिक न्याय,* पुणे : डायमंड प्रकाशन. Pg. 46
2. खाडे, सो. गो. (2004). आनंददायी शालेय शिक्षण, *शिक्षण संक्रमण,* जुलै–2004, पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
3. दूधे, मा. रा. (2003). समाज आणि शाळा पुरक नाते, *शिक्षण संक्रमण,* जानेवारी–2003, पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
4. वाघमारे, ज., (2009). *लोकशाही आणि शिक्षण,* पुणे : पद्मगंधा प्रकाशन Pg. 23
5. कुलकर्णी, पी. के. (2014). *प्रगत समाजशास्त्रीय सिध्दांत,* नागपूर : मंगेश प्रकाशन. Pg. 18
6. मेहेंदळे, य. श्री. (1973). *समाजशास्त्राची मूलतत्वे,* पुणे : मेंहेंदळे प्रकाशन Pg. 221
7. मुळे, रा. शं., आणि उमाठे, वि. तु. (1998). *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे,* औरंगाबाद : विद्या प्रकाशन. Pg. 64
8. नवले, एस. जी. (2005). शाळा एक संस्कार केंद्र, *जीवन शिक्षण,* जुलै–2005, पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. Pg. 27
9. देसले, एस्. वाय्., आणि भदाणे, एम्. ए. (2009). *शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र,* नाशिक : रेशमाई प्रकाशन. Pg. 113
10. पिचड, न., आणि बरकले, रा. (2005). *अध्यापनशास्त्रीय विश्लेषण,* नाशिक : इनसाईट प्रकाशन. Pg. 76
11. Dhand, H. V. (2006). *A handbook for teachers - Research in teaching of the social studies,* Delhi : Gryphon Press. Pg. 279
12. साळुंके, क. (2008). *कृतिसंशोधन आराखडा व अहवाल लेखन कार्यपुस्तिका,* नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ. Pg. 52
13. बापट, भा. गो. (1995). *शैक्षणिक संशोधन,* पुणे : नूतन प्रकाशन. Pg. 56
14. Best, J. W., & Khan, J. V. (2008). *Research in Education,* New Delhi: Prayantaies of India. Pg. 214
15. भिंताडे, वि. रा. (2005). *शैक्षणिक संशोधन पद्धती,* पुणे : नूतन प्रकाशन. Pg. 27
16. पारसनीस, एच., आणि देशपांडे, एल. (2003). *शैक्षणिक कृती संशोधन,* पुणे : नूतन प्रकाशन. Pg. 76